वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शनिवार दि. २० सप्टेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

## अजित पवारांची मंत्र्यांना तंबी,चिंतन शिबिरात सुनावले खडेबोल

# वेळ नसेल तर खुर्ची रिकामी करा



Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

### पुढे विमानासारखे दरवाजे बंद

शिबिराची सुरुवात सकाळी ९:३० वाजता झाली. यावेळी बहुतांश मंत्री व आमदार उपस्थित नव्हते. यावर अजित पवार यांनी उघड नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, पक्ष एक दिवस बोलवतो आणि आपण वेळेवर येत नाही. यापुढे ९:३० वाजताच विमानासारखे दरवाजे बंद करू. जे उशिरा येतील त्यांना बाहेरच राहू द्या. त्यांना वेळेच महत्त्व कळू द्या.शिबिरात राष्ट्रीय कार्याध्यक्ष खा. प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, दिलीप वळसे पाटील, छगन भुजबळ, धनंजय मुंडे, नरहरी झिरवळ, अदिती तटकरे यांच्यासह पक्षाचे मंत्री, खासदार, आमदार, जिल्हाध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते

मुंबई, (दिव्य न्यूज):- ज्यांना पालकमंत्रिपद मिळाले त्यांना तेथे जावेच लागेल. मंत्र्यांनी पदाधिकारी, कार्यकर्ते यांना सोबत घेऊन फिरा. काही मंत्री जिल्हाध्यक्षांना विचारत नाही. असे चालणार नाही. यापुढे मंत्र्यांना तीन दिवस मुंबईत, एक दिवस मतदारसंघात व तीन दिवस पक्षासाठी द्यावे लागतील. जे मंत्री वेळ देणार नाहीत त्यांना खुर्ची खाली करावी लागेल. दुसऱ्यांना संधी देऊ, अशी तंबी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वपक्षीय मंत्र्यांना दिली.

अजित पवार गटाचे चिंतन शिबिर शुक्रवारी नागपुरात पार पडले. यावेळी अजित पवार यांनी मंत्र्यांचा चांगलाच क्लास घेतला. ते म्हणाले, काही लोक काही काम न करता प्रसिद्धी घेतात. माझ्यासह सर्वांनी जमिनीवर सक्रिय राहा. यापुढे प्रत्येक जिल्ह्यात दर तीन महिन्यांनी जनसंवाद घेऊ. संघटनात्मक पद भरती करू. पद भरली पण अपेक्षा पूर्ण होत नाही तेथे फेरविचार करू, असा सूचक इशाराही त्यांनी दिला. पक्ष प्रवेश देताना त्या व्यक्तीची प्रतिमा जनमानसात चांगली असावी हे आधी तपासा, असा सल्लाही त्यांनी दिला.

▶▶ पान २ वर

## जि.प.शाळेच्या केंद्रप्रमुखाला पाच हजारांची लाचघेतांना पकडला

### गेवराईतील एसीबीच्या पथकाची कारवाई

गेवराई , (दिव्य न्यूज):-तालुक्यातील धारवंटा येथील गोविंद सुखदेव शेळके (वय ५६), केंद्रप्रमुख, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कोळगाव यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पाच हजार रुपयांची लाच स्वीकारताना शनिवारी (दि.२०) रंगेहाथ पकडले.

तक्रारदार यांनी कोळगाव (ता. गेवराई) येथील आर्थिक अनियमिततेसंबंधी चालू खात्याअंतर्गत चौकशी अहवाल व्यवस्थित पाठवून मदत करण्यासाठी शेळके यांनी ५ हजार रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी १८ सप्टेंबर रोजी बीड येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे पोनि. राहुलकुमार भोळ यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली. तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी केल्यानंतर शेळके यांनी तडजोडीअंती ५ हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य केले. २० सप्टेंबर रोजी तक्रारदार यांच्या घराजवळील कृषी कॉलनी येथे, पंचासमक्ष तक्रारदारांकडून पाच हजार रुपयांची लाच स्वीकारत असताना बीड एसीबीच्या पथकाने शेळके यांना रंगेहात पकडले. पंचासमक्ष लाचेची रक्कम जप्त करण्यात आली. याप्रकरणी बीड येथील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई बीड एसीबीचे उपअधीक्षक सोपान चिट्टमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुलकुमार भोळ यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पथकात पोलीस समाधान कवडे, सपोउपनि सुरेश सांगळे, पोलीस अंमलदार मच्छिंद्र बीडकर, पांडुरंग काचगुंडे, अनिल राठोड, अविनाश गवळी, प्रदीप सुरवसे, राजकुमार आघाव, सचिन काळे, अंबादास पुरी व गणेश मेत्रे यांनी सहभाग घेतला.

## उर्दू साहित्य अकादमीची १ कोटी २० लाख निधीवर बोळवण

### महायुती सरकारने आश्वासनाचा भंग केला-आ.रईस शेख

मुंबई , (दिव्य न्यूज):- राज्य उर्दू साहित्य अकादमी यंदा सुवर्ण महोत्सव साजरा करत असून सुवर्ण महोत्सवी वर्षात फक्त १ कोटी २० लाख इतक्या अत्यल्प निधीवर बोळवण करत महायुती सरकारने वचनभंग केला आहे. राज्य सरकार अल्पसंख्याक समाजाच्या संस्थांना जाणिवपूर्वक भेदभावाची वागणूक देत आहे, असा आरोप समाजवादी पक्षाचे 'भिवंडी पूर्व'चे आमदार रईस शेख यांनी केला आहे. तसेच उर्दू अकादमीला ५० कोटी निधी द्यावा, अशी मागणी आमदार शेख यांनी अल्पसंख्याक मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात माहिती देताना आमदार रईस शेख म्हणाले की, गुरुवारी शासन निर्णयाव्दारे उर्दू साहित्य अकादमीला सुवर्ण महोत्सवाचे कार्यक्रम आयोजन करण्यासाठी १ कोटी २० लाख रुपये आणि अकादमीच्या आस्थापना खर्चासाठी ११ लाख ७६ हजार इतका अत्यल्प निधी वितरीत केला.

▶▶ पान २ वर



## मुख्याधिकारी साहेब, त्या बिल कलेक्टराची तात्काळ हकालपट्टी करा

### गट क्रं. ३/१७, ३/१८ मध्ये झालेल्या बेकायदेशीर नामांतरासह पीटीआरवर झालेल्या बांधकाच्या नोंदीची सखोल चौकशी करा

बीड, (दिव्य न्युज):- मागील मुख्याधिकारी निता अंधारे यांच्या आशिर्वादाने ३/१७ आणि ३/१८ चा वसूली अधिकारी म्हणून टेबल घेणाऱ्या वसूली अधिकाऱ्यांनी अंदाधूंद कामे करायला सुरूवात केली आहे. निलंबित झालेल्या या बिल कलेक्टरांनी मागील मुख्याधिकाऱ्याला तोंड भरून पैसे देवून हा टेबल मिळविला आहे. या मिळालेल्या संधीचे या बिल कलेक्टरांनी सोनं करण्याचे ठरविले आहे. मागचा पुढचा कोणताच विचार न करता या बिल कलेक्टरांनी आपल्याकडील असलेल्या ३/१७/,३/१८ मध्ये अनेक बेकायदेशीर नामांतर केलेले आहे तसेच या गटामधील अने बांधकामे हे बेकादेशीर आणि बांधकाम परवानगी न घेताच करण्यात आलेले आहे. पण या बील कलेक्टरांनी लाखो रूपये घेवून अनेक पीटीआर धारकांना आपल्या पीटीआरवर बांधकामाची नोंद करून नगर पालिकेचा करोडो रूपयांचे नुकसान केले आहे. या गटामधील किती जणांनी बांधकाम परवानगी घेतली याची सखोल चौकशी करणे गरजेचे असून बांधकाम परवानगी घेतली नसतांनाही मग त्यांच्या

▶▶ पान २ वर

### या बिल कलेक्टरचा एकच धंदा,पैसा द्या आणि कसलेही नामांतर करून घ्या




## मुख्याधिकारी साहेब, तरोडे-मोहिते यांनी दिलेल्या बांधकाम परवान्याची सखोल चौकशी करा

### इमारती पुर्ण झाल्यानंतरही बांधकाम परवाने कोणत्या नियमाप्रमाणे दिले याचीही चौकशी करा

बीड, (दिव्य न्युज):- मुख्याधिकारी साहेब तुम्हाला येवून दोन महिन्यापेक्षा जास्त दिवस झाले आता तुम्ही तुमची ते एअर कंडिशन कॅबिन सोडा आणि जरा सर्व विभागात जावून झालेल्या सर्व कामांची चौकशी करा? तुमच्या नगर पालिकेती सर्वच विभागात बेकायदेशी कामांचा धडाका सुरू असून नगर रचना विभागाही मागे राहिलेला नाही. तरोडे आणि मोहिते यांनी आपल्या अधिकारात आज पर्यंत किती बांधकाम परवाने दिले? किती कंपलेशन प्रमाणपत्र दिले याची जरा बारकाईने चौकशी करा? या दोघांनी ज्या ज्या इमारतीला बांधकाम करण्यासाठी परवानगी दिली त्याची जरा सखोल चौकशी कराच...... मिळालेल्या माहितीनुसार या दोघांनीही अनेकांना इमारत बांधकाम पुर्ण झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात पैसे घेवूल बांधकाम परवानगी दिलेली आहे. प्लॉट धारकांनी स्वतःच्या प्लॉटच्या बाजुला असलेल्या मोकळ्या जागेत उभा राहुन फोटो दिले. त्या फोटोच्या आधारे त्या दोघांनी इमारत बांधकामाचे परवानगी दिलेली आहे. यामध्ये कोणत्या

▶▶ पान २ वर

### सोमवारी स्वस्त धान्य दुकान क्रं.३१ चे कार्डधारक

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बोगसगिरीचा भांडेफोड करणार

### अनेक कार्ड धारकांचे अन्य धान्य गिळून लाखो रूपयांची माया कमविणाऱ्या काटेंचा आता कार्ड धारक काटाच काढणार



बीड, (दिव्य न्युज):-शहरातील पालवण चौक येथे कार्ड धारकांचे अन्न धान्य गिळून लाखो रूपयांची माया कमविणाऱ्या काटे याची दुकान क्रं. ३१ चा भांडाफोड सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दालनात फोडले जाणार आहे. या काटेंनी त्याच्याकडे असलेल्या अनेक कार्ड धारकांचे धान्य गिळून लाखो रूपयांची बेनामी मालमत्ता जमा केली

## मंत्री अतुल सावेंच्या गाडीवर दगडफेक; ताब्यात घेतलेला तरुण मनोरुग्ण!



औरंगाबाद, (दिव्य न्यूज):- राज्याचे बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या गाडीवर औरंगाबादमध्ये दगडफेक करण्यात आली आहे. पुंडलीकनगर भागात सावे यांचे संपर्क कार्यालय आहे. ते ऑफिसमध्ये बसलेले असताना बाहेर उभ्या असलेल्या त्यांच्या गाडीवर एका तरुणाने दगड मारला. यात गाडीची काच फुटली. हा प्रकार पाहिल्यानंतर कार्यालयात उपस्थित असलेल्या पदाधिकाऱ्यांनी गाडीकडे धाव घेत दगडफेक करणाऱ्या तरुणाला पकडले.दरम्यान, दगडफेक करणारा तरुण ज्याचे नाव गणेश

▶▶ पान २ वर

## दिल्लीत भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्ष निवडीनं महाराष्ट्रात राजकीय भूकंप?

नवी दिल्ली, (वृत्तसेवा):- भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचा कार्यकाळ गेल्या वर्षीच संपलेला आहे. त्यांना मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सध्या त्यांच्याकडे दोन महत्त्वाच्या जबाबदाऱ्या आहेत. भाजपचे अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री अशा दुहेरी भूमिकेत सध्या नड्डा काम करत आहेत. भाजपमध्ये एक व्यक्ती, एक पद असा नियम आहे. पण नड्डा त्या नियमाला अपवाद ठरत आहेत. नड्डा यांचा कार्यकाळ संपून दीड

▶▶ पान २ वर



# आ.क्षीरसागरांकडून सलग दुसऱ्या दिवशी अतिवृष्टीची पाहणी

## विविध ठिकाणी पाहणी करत शेतकऱ्यांना दिला धीर

### शिरूर (का) महसूल मंडळात झालेल्या नुकसानीची सरसकट नुकसान भरपाई द्या







बीड,(दिव्य न्युज):- अतिवृष्टीमुळे शिरूर (का) तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून आ.संदीप क्षीरसागर यांनी नुकसान झालेल्या विविध ठिकाणी पाहणी करत शेतकऱ्यांना सरसकट भरपाईची मागणी केली.

मागील काही दिवसांपासून बीड आणि शिरूर (का) सातत्याने पाऊस पडत असून अनेक महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे. त्यापैकी शुक्रवारी बीड तालुक्यातील नुकसान झालेल्या ठिकाणी शुक्रवारी संदीप क्षीरसागर यांनी जाऊन पाहणी केली होती. आज त्यांनी शिरूर (का) तालुक्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या हिवरसिंगा येथील कॅनॉल रोड, रोकडेश्वर नगर, बरगवाडी, घुगेवाडी, रौंद वस्ती (खरगवाडी), धनगरवाडी,कस्पटेवस्ती, कैतके वस्ती खालापुरी, भानकवाडी (वरची) या ठिकाणी जाऊन नुकसानीची पाहणी केली.शेतामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचलेलं पाहावयास मिळाले. असे वाटत होते की ते शेत नसून लहानसं तळं तयार झालंय. कुठे माती वाहून गेल्यामुळे शेत नुसतंच उघडं पडलेलं आहे. कुठे उभं पीक डोळ्यासमोर पाण्याखाली जाऊन नष्ट झालं आहे.बीड मतदारसंघातील खोकरमोहा ता. शिरूर कासार येथील शेतकरी बांधवाशी संवाद साधला. त्यांच्या समस्या, दुखः समजून घेतले. यावेळी मुख्य रस्ता तयार करण्यासाठी मागणी झाली, नदीवारील नविन पुल बांधकाम करणे, बंधारा दुरूस्त करणे, वस्तीवरील रस्त्याचे काम थांबलेले आहे ते पुन्हा सुरू करणे व जायकवाडी क्रं ३ च्या तलावाची दुरूस्ती पाहणी करून लवकरच या बाबतीत कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले. याठिकाणच्या गावातील झालेल्या शेतकरी बांधवांच्या पीक नुकसानीचे, सार्वजनिक मालमत्तेचे व इतर ठिकाणचे बीड विधानसभेचे आ. संदीप क्षीरसागर यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी शासनाकडे बीड आणि शिरूर का तालुक्यातील सर्व महसूल मंडळात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी देखील केली.बीड विधानसभा मतदारसंघात शिरूर तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन चे पिक अक्षरशः पाण्यात गेले आहे. शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. नुकसान पाहणी वेळी प्रत्यक्ष प्रशासनाला तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच शेतकऱ्यांना कसलाही विलंब न लावता सरसकट आर्थिक मदत द्यावी. शेतकरी बांधवांना न्याय मिळेपर्यंत प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले.

मागील काही दिवसांपासून बीड तालुक्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यांच्या शेतात जाऊन नुकसानीची पाहणी केली. त्यावेळी शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा मांडल्या. पावसामुळे झालेल्या नुकसानीची माहिती देताना त्यांच्या डोळ्यातले पाणी सर्व काही सांगून जात होते. संदीप भैय्या आम्हाला आर्थिक मदत मिळवून द्या, या नुकसानीतून वाचवा असा टाहो फोडताना शेतकऱ्यांच्या डोळ्यातले पाणी मन हेलावून टाकणारे होते.



**बीड : येथील प्रसिध्द दैनिक प्रसारचे संपादक समीर काझी यांनी नवीन बांधलेल्या घरात काल गृहप्रवेश केला. काल आयोजित गृहप्रवेश कार्यक्रमात उपस्थित राहुन संपादक समीर काझी व त्यांच्या वडील काझी साहेब यांना हार,शाल भेटवस्तू देवून शुभेच्छा दिल्या. यावेळी विविध मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. महाराष्ट्र मुस्लिम पत्रकार फाऊंडेशन व कश्मकश, दिव्य वार्ता तर्फे समीर काझी व काझी कुटूंबियांना शुभेच्छा**

## वाल्मिक कराडचा राईट हँड गोट्या गित्तेसह ५ जणांचा मकोका रद्द

बीड, (दिव्य न्यूज):- वाल्मिक कराडचा कट्टर समर्थक असलेल्या रघुनाथ फड गँगवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. परळी तालुक्यातील सहदेव सातभाई यांच्यावर हल्ला करत हत्येचा प्रयत्न केल्या प्रकरणी बीड पोलिसांनी ७ जणांवर मकोका अंतर्गत कारवाई केली होती. पण, यामधून आता ५ जणांना दिलासा देण्यात आला आहे. पोलिस महासंचालकांनी त्यांच्यावरील मकोका रद्द केला आहे. गोट्या गित्ते, जगन्नाथ फड, संदीप सोनवणे, बालाजी दहिफळे, विलास गिते यांच्यावरील मकोका हटवण्यात आला आहे. तर, गँगचा मोरक्या रघुनाथ फड आणि धनराज फड यांच्यावरील मकोका कायम ठेवण्यात आला आहे.

गोट्या गित्ते हा वाल्मिक कराडचा राईट हँड असून तो अद्याप फरार आहे. त्याला अटक न करताच, चौकशी करण्याआधीच मकोकातून दिलासा मिळाल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत.काही दिवसांपूर्वीच गोट्या गित्तेने रेल्वे पटरीवर बसून एक व्हिडीओ शेअर केला होता. यामध्ये तो म्हणाला होता की, आम्हाला बदनाम करण्याचे काम सुरू आहे. वाल्मिक कराडवर खोटे आरोप केले जात आहेत. विशेष म्हणजे या व्हिडीओमध्ये त्याने जितेंद्र आव्हाड यांच्यावरही आरोप केले होते. माझ्या जीवाला काही झाले तर त्याला जितेंद्र आव्हाड जबाबदार असतील असे त्याने म्हटले होते. पोलिस गेल्या काही दिवसांपासून गोट्या गित्तेच्या शोधात होते. पण, अद्यापही पोलिसांच्या काही हाती लागला नाही.

पान ४ वरून

### ढोलकीच्या तालावर

उपसरपंचाची आत्महत्या अन् कलाकेंद्र चर्चेत

सोलापूरमधील एका पूजा गायकवाड नावाच्या नर्तिकेच्या प्रेमात आंधळे होऊन गेवराई तालुक्यातील लुखा मसला येथील गोविंद बरगे या उपसरपंचाने डोक्यात गोळी झाडून घेत आत्महत्या केली होती. पूजाच्या नावावार लाखोंची मालमत्ता करून दिली. शिवाय नातेवाइकांनाही महागड्या वस्तू दिल्या. त्यानंतरही तिला बंगला हवा होता. तो न दिल्याने तिने बोलणे बंद केले आणि गोविंद यांनी जीवन संपविले. या घटनेमुळे कलाकेंद्र चर्चेत आले आहेत.

### महाराष्ट्र वक्फ बोर्डाचे

पत्रकार समिती स्थापन करण्याचे ठरले आहे. ही समिती जिल्हाहलभरातील पत्रकार बांधवांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेणार असून, पुढील तीस दिवसांत तयार होणारा अहवाल वक्फ बोर्डाच्या चेअरमन समीर काझी यांच्याकडे सादर केला जाणार आहे. हा उपक्रम ऐतिहासिक ठरणार असून, मुस्लिम पत्रकारांच्या हितासाठी वक्फ बोर्ड व पत्रकार संघटनेतील समन्वयामुळे पत्रकारांच्या अपेक्षांना न्याय मिळेल, असा विश्वास पदाधिकारी व उपस्थितांनी व्यक्त केला.

### शासनाच्या कामगार

राजकीय पक्षांच्या कामगार संघटना देखील आहेत. शिवाय राजकीय पक्ष विरहित सुद्धा अनेक कामगार संघटना आहेत परंतु शासनाने घेतलेल्या बारा तासांच्या पाळीचा निर्णय जो कामगारांसाठी यातना देणारा आहे, त्या निर्णयाविरोधात आतापर्यंत एकही कामगार संघटना पुढे आल्याचे दिसले नाही. असे का? कामगार संघटना झोपल्या की मॅनेज झाल्या? शासनाने घेतलेल्या कामगार विरोधी निर्णयाविरोधात कामगार संघटना पुढे का येत नाहीत? कामगार संघटनांमधील धमक लोप पावली की काय? असे प्रश्न समाजातून उपस्थित केले जात आहे. हे पाहता निदान बीड जिल्ह्यातील कामगार संघटनांनी तरी शासनाने कामगार विरोधात घेतलेल्या निर्णयाविरुद्ध पुढे यावे आणि शासनाने घेतलेला हा निर्णय रद्द करावयास लावावा असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.

### उमरगा तहसील

पाऊल ठेवावे, त्यासाठी आपण सर्वोतापरी मदत करू, अशी ग्वाही यावेळी देण्यात आले आहे . जिल्ह्यातील युवक-युवतींना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करण्यास प्रोत्साहन देण्याच्या अनुषंगाने या स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. सरकारी योजनांचा लाभ घेऊन तरुणाईने स्वतःचा उद्योग सुरू करावा, व्यवसाय वृद्धिंगत करावा आणि रोजगारनिर्मितीचे नवे मार्ग खुला करावेत, यासाठी हा मेळावा उपयुक्त व्यासपीठ ठरला. धाराशिव जिल्ह्यातील इतरही तालुक्यांमध्ये अशा प्रकारे स्वयंरोजगार मेळावा आयोजित करण्यात येत आहे. याप्रसंगी विविध मंडळाचे अधिकारी कर्मचारी व महिला, तरुण युवक, मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी उपाध्यक्ष कैलास शिंदे, दिलीपसिंह गौतम, उमरगा शहर तालुकाध्यक्ष ॲड साईराज टाचले, उमरगा ग्रामीण तालुकाध्यक्ष सिद्धेशवर माने, विठ्ठल चिकुंद्रे, ॲड.सुशिलकुमार शिंदे, लोकेश बिराजदार, मल्लिकार्जुन साखरे, उमाजी मंडले, शिवा माने, संतोष वखारे, विवेकानंद हंगरगे, अमित राजपूत, सागर पाटील,प्रशांत माने, राम सुरवसे आदी उपस्थित होते. या मेळाव्यात तरुणाईने आणि विशेषतः महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रम यशस्वी केला..

### कालिकादेवी

विद्यार्थ्यांची उपस्थिती, तसेच प्रत्येक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मनापासून सहभाग घ्यावा. नियमित वाचनाची सवय लावावी अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप करताना, प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याची माहिती देऊन विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गोडी लागावी यासाठी विद्यार्थ्यांना संबोधित केले. कार्यक्रमाचे सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ खंडू वाघमारे तर आभार नवनाथ पवळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनी शिक्षक शिक्षकेतर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून

### वेळ नसेल तर

प्रफुल्ल पटेल काय म्हणाले?

मी कुणाबद्दल विशेष काही सांगू इच्छित नाही. पण पर्यटनासाठी मेहरबानी करून कुणी येऊ नये. जिल्ह्यात केवळ दोन तासांसाठी जावून फक्त तोंड दाखवून नंतर मुंबईला अजित दादा, खासदार सुनील तटकरे किंवा माझ्याकडे येऊन मी या जिल्ह्यात जावून आलो असं सांगायला येऊ नये. दोन तासांसाठी मेहरबानी करून जिल्ह्यात येऊ नये. आमच्या सहकाऱ्यांना मदत कशी होईल, त्यांना ताकद कशी मिळेल यासाठी जिल्ह्यात यायचं असेल तरच या, असं प्रफुल्ल पटेल यांनी मंत्र्यांना सुनावलं आहे.

### उर्दू साहित्य अकादमीची

तत्कालीन अल्पसंख्यक मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याबरोबर माझी ८ जुलै रोजी बैठक झाली होती, त्या बैठकीत अकादमीसाठी ५० वर्षांच्या मुदतीमध्ये ५० कोटीचा स्थायी निधी ठेवण्यात येईल. तसेच दरवर्षी अकादमीला ५ कोटी रुपये अनुदान देण्यात येईल, अशी हमी देण्यात आली होती. विद्यमान अल्पसंख्याक मंत्री माणिकराव कोकाटे यांना ऑगस्ट मध्ये पत्र पाठवून अकादमीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे विविध कार्यक्रम करण्यासाठी ५० कोटी निधी देण्याची मागणी केली होती.

काल प्रसिद्ध करण्यात आलेल्या शासन निर्णयामध्ये अल्यल्प निधी देवून बैठकीतील सर्व तरतुदींना राज्य शासनाने हरताळ फासला आहे. महाराष्ट्रात उर्दू भाषकांची संख्या ७५ लाख असून २५ उर्दू दैनिके प्रकाशित होतात. उर्दू ही हिंदुस्थानी जबान आहे. उर्दू साहित्य अकादमी यंदा सुवर्ण महोत्सव साजरा करत असताना तुटपुंजा निधी देवून अल्पसंख्याक समाजाला महायुती सरकार सापत्न वागणूक देत असल्याचे पुन्हा अधोरेखीत झाले आहे. यासदंर्भात आपण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे दाद मागणार आहोत, असे आमदार रईस शेख यांनी सांगितले.

### जिल्हाधिकारी

आहे. गोर गरीबांचे अन्न धान्य खाणाऱ्या या महेशासूर ला चांगलाच धडा शिकविणाला जाणार आहे. या दुकानामध्ये बीड शहरातील इतर भागाचे कार्ड धारक कसे याचीही सखोल चौकशी लावली जाणार आहे.

पालवण चौक येथे असलेल्या दुकानामध्ये गांधी नगरमधील कार्ड धारक कसे? ते गरीब अंतोदयचे कार्ड धारक गांधी नगरमधून पालवण चौक येथे ७०-८० रूपयाचे धान्य घेण्यासाठी रिक्षामध्ये जायला १५० रूपयांच्या आसपास पैसे लागतात म्हणजे चाराण्याची कोंबडी आणि बाराण्याचा मशाला असेच म्हणता येईल. ही दुकान कधीच वेळेवर चालु राहत नाही. या काटे महाशयांना कार्ड धारकांनी फोन लावला तर ते महाशय फोन ही उचलत नाहीत. लोखंडाचे भलेमोठे गट या महाशयांनी स्वतःच्या दुकनासमोर लावून मी किती १ नंबरी आहे याचे फलक त्या गेटवर लावलेले आहे. काटेंनी आता पर्यत किती धान्य उचलले, कोण कोणत्या कार्ड धारकांना धान्य दिले,कोण कोणत्या कार्ड धारकांचे अन्य धान्य गिळून बसला याचा आता लेखा जोखाच जिल्हाधिकाऱ्यांसमोर कार्ड धारक मांडणार आहेत. पालवण चौक परिसरात इतरही स्वस्त धान्य दुकान असुन त्या दुकानामध्येही अशाच पध्दतीने गोर गरीब कार्ड धारकांचे अन्न धान्य गिळण्याचा धंदा जोरात सुरू आहे. या दुकानदारांना जिल्हा पुरवठा अधिकारी, नायब तहसिलदार आणि गोडाऊन किपरचा आशिर्वाद असून काटेंकडून गोर गरीबांचे अन्न धान्य बाजारात विकून आलेल्या पैशातून काही हिस्सा पुरवठा अधिकारी, नायब तहसिलदार आणि गोडाऊन किपरच्या खिशात टाकला जात आहे. आता या काटेंचा हिशोब सोमवारी नक्कीच कार्ड धारक करणार आहेत.

### हकालपट्टी करा

पीटीआरवर बांधकामाची नोंद कशी? त्याला कोणी मंजूरी दिली? त्या भुखंड धारकांकडून किती पट दंड आकारण्यात आला, संचिकेला कोणी मंजूरी दिली याची चौकशी करणे गरजेचे असून या परिसरात जास्त प्रमाणात इनामी जमीन असून भोगट धारकांची संख्या जास्त आहे. सर्वच पीटीआर या ठिकाणी भोगटदारामध्ये असतांना ते मालकी हक्कामध्ये कोणत्या अधिकाराने करण्यात आले याची सखोल चौकशी करणे गरजेचे असून मुख्याधिकारी फडसे साहेबांनी कॅबिनमध्ये न बसता वसूली विभागात बसून या सर्व बेकायदेशी कामाची सखोल चौकशी करणे गरजेचे आहे. या गटामधील बिल कलेक्टरांनी केलेले अनेक बेकायदेशी कामांना न.प.मधील कोण कोणत्या अधिकाऱ्यांचा सहभाग आहे याचीही सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.

### मुख्याधिकारी साहेब,

खाजगी अभियंत्यानी याची फाईल तयार केली याचीही माहिती घ्या.... कारण, या तिघांच्याच संगनमताने हे बेकायदेशीर कामे झालेली आहेत. यामुळे नगर पालिकेचा लाखो रूपयांचे नुकसान झाले असून आर्थिक नुकसान करणाऱ्या या तिघांवर गुन्हे दाखल करणे गरजेचे आहे. पुढील अंकात तरोडे आणि माहिते यांनी कोण कोणत्या इमारतीला बांधकाम परवानगी दिली? किती बांधकाम पुर्ण झाले ते प्रमाणपत्र दिले? या दोघांना कोणाचा आशिर्वाद आहे? या बेकायदेशी कामांमुळे नगर पालिकेचे किती आर्थिक नुकसान झाले याची सविस्तर बातमी प्रकाशित करण्यात येईल.

### दिल्लीत भाजपच्या राष्ट्रीय

वर्ष उलटलं तरीही भाजपला अद्याप दुसरा अध्यक्ष निवडता आलेला नाही. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीनंतर दिल्लीत अध्यक्ष पदाच्या निवडीचे वारे वाहू लागले आहेत. या बदलाच्या वाऱ्यांनी महाराष्ट्रात राजकीय भूकंपाची शक्यता आहे.

उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत एनडीएचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन विजयी झाले. त्यांच्या विजयानं ओबीसी व्यक्ती उपराष्ट्रपती पदावर विराजमान झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीदेखील ओबीसी समाजातून येतात. विद्यमान राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू या आदिवासी समाजातून येतात. त्याआधीचे राष्ट्रपती राहिलेले रामनाथ कोविंद दलित समाजातील होते. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीनंतर बदललेली सामाजिक समीकरणं पाहता आता भाजपच्या अध्यक्षपदी ब्राह्मण व्यक्तीला संधी मिळू शकते. भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या निकटवर्तीयानं याबद्दलची माहिती दिली आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ब्राह्मण चेहऱ्यासाठी आग्रही आहे. या शर्यतीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं नाव आघाडीवर आहे. पक्षात पुढील पिढीचं नेतृत्व घडवण्यासाठी फडणवीस यांना संधी दिली जाऊ शकते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कायमच फडणवीस यांच्या पाठीशी राहिला आहे. फडणवीस दिल्लीत गेल्यास राज्यात राजकीय भूकंप घडू शकतो. फडणवीस भाजपचे अध्यक्ष झाल्यास राज्यातील सरकारचं नेतृत्व कोणाकडे दिलं जाणार? भाजप कोणाला संधी देणार? हे प्रश्न महत्त्वाचे आहेत.

भाजप आणि संघ यांच्यात एकमत होत नसल्यानं अध्यक्ष पदाच्या निवडीचा विषय दीड वर्षांपासून सुटलेला नाही. राष्ट्रीय अध्यक्षपदी पुन्हा गुजराती व्यक्तीला संधी देण्यास संघ तयार नाही. त्यामुळे गुजरात भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील आणि केंद्रीय मंत्री पुरुषोत्तम रुपाला यांच्या नावांना संघाचा विरोध आहे. चंद्रकांत पाटीलदेखील केंद्रात मंत्री आहेत. नड्डा यांच्या आधी अमित शहा भाजपचे अध्यक्ष होते. त्यामुळे पुन्हा एकदा गुजराती चेहऱ्याला अध्यक्षपद देण्यास संघाचा ठाम नकार आहे.

दुसरीकडे संघानं संजय जोशी यांचं नाव सुचवलं आहे. पण त्यांच्या नावाला भाजप श्रेष्ठींचा विरोध आहे. मोदी आणि संजय जोशी यांनी गुजरातमध्ये ९० च्या दशकात सोबत काम केलं. दोघांच्या कामांची पद्धत वेगळी आहे. त्यातून दोघांमध्ये मतभेद झाले. ते अतिशय टोकाला गेले. त्यामुळे संजय जोशी यांना अध्यक्षपद देण्यास भाजप नेतृत्त्वाचा विरोध आहे.

### मंत्री अतुल सावेंच्या

सखाराम शेजूळ हा त्याच भागातील हनुमाननगरचा रहिवासी आहे. तो लोकाकंडून पैसे मागत असतो. सावे यांच्या संपर्क कार्यालयातील कर्मचारी, पदाधिकारी देखील या तरुणाला पैसे देत होते, अशी माहिती आहे. आजही नेहमी प्रमाणे अतुल सावे संपर्क कार्यालयात बसलेले असताना हा तरुण पैसे मागून गोंधळ घालत होता. तेव्हा त्याला थोडे फार पैसे देऊन तिथून हुसकावून लावण्याचा प्रयत्न झाला.पण कमी पैसे दिले म्हणून संतापलेल्या गणेशने शेजारी पडलेला दगड उचलला आणि तो सावे यांच्या उभ्या असलेल्या गाडीच्या समोरच्या बाजूच्या काचेवर मारला. (इगझ) चालकाच्या शेजारील काच यामुळे फुटली. गाडीवर दगड फेकल्याचे समजताच सावेंचे कार्यकर्ते धावत आले आणि गणेश शेजूळ या तरूणाला पकडले. परंतु तो पैसे मागायला नेहमी येत असल्याने बरेच जण त्याला ओळखत होते. तो मनोरुण असल्याची माहिती आहे.

ही माहिती कळताच पुंडलीकनगर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. गणेश शेजूळ याला पोलीसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलीस निरीक्षक अशोक भंडारे यांनी सांगितले. दरम्यान, दगडफेक करणारा तरुण हा मनोरुण असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दगडफेक केल्यानंतर पोलीसांनी त्याला ताब्यात घेतल्याचे समजताच कुटुंबियांनी पुंडलीकनगर पोलीस ठाण्यात धाव घेतली. आमचा मुलगा मनोरुण आहे, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असल्याची कागदपत्र त्यांनी पोलीसांना दाखवली. अतुल सावे यांच्या गाडीवर दगडफेक झाल्याची शहरभरात चर्चा आहे. परंतु या प्रकारानंतर अतुल सावे यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे.